# जाहिरात प्रारुप
# जिल्हा कोविड १९ साथरोग नियंत्रण यवतमाळ
# कंत्राटी पद भरती

कोविड-१९ या साथरोगाच्या अंमलबजावणीच्या अनुशंगाने रिक्त पदांची पदभरती प्रक्रिया खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर प्रत्येक्ष(जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,यवतामळ) येथे खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यत येत आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | शैक्षणीक अर्हता | एकत्रिक मानधन मासीक | वय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | MBBS | ६००००/– | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ राखीव प्रवर्ग (७० वर्ष सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी) | एमबीबीएस उमेदवार मिळत नसल्यास विएएमएस,बियुएमएस व बिडीएस उमेदवास नियुक्ती करण्यात येईल. |
| | | BAMS / BUMS / BDS | ३००००/– | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ राखीव प्रवर्ग | |
| २ | प्रयोगशाळा तज्ञ | Bsc DMLT | १७०००/– | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ राखीव प्रवर्ग | |
| ३ | अधिपरीचारीका | GNM / Bsc Nursing | २००००/– | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ राखीव प्रवर्ग (६५ वर्ष सेवानिवृत्त अधिपरीचारीका) | |
| ४ | क्ष-किरण तज्ञ | 10+2 With Diploma in relevant Field | १७०००/– | ३८ वर्ष खुला प्रवर्ग ४३ राखीव प्रवर्ग | |

अटी व शर्ती :-

१) इच्छूक उमेदवारांनी दिनांक ०८/०८/२०२० ते १२/०८/२०२० रोजी (सुटटीचे दिवस सोडून) सांय ६.०० वाजेपर्यंतया कार्यालयाच्या अर्ज सादर करण्यात यावे. १) वयाचा पुरावा २) पदवी / पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) ५) शासकीय / निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र विनंती अर्ज नमुना जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ कार्यालया मध्ये सादर करण्यात यावा.

२) तसेच प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवाराच्या Qualifying Exam मध्ये अतिंम वर्षाम्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणीक अर्हेत + शासकीय / निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन ज्या उमेदवारास जास्त गुण आहेत अशा उमेदवाराची निवड करण्यात येईल. कोविड-१९ या साथरोगाचा प्रादुर्भाव असल्याने कुठलीही मुलाखत न घेता व आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेशबाबत कार्यवाही करण्यात येईल, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) वरिल सर्व पदे तात्पुरती कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन त्यांचा कालावधी हा कोविड-१९ साथरोगाच्या व्यवस्थपनाकरीता तात्पुरत्या कालावधीसाठी (दोन महिने किंवा त्यापेक्षा कमी) भरण्यात येणार आहेत. अथवा त्या आधी मंजुरी न मिळाल्यास पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

४) केंद्र / राज्य शासनाने संबंधीत पदे नामंजुर केल्यास उमेदवारची सेवा कोणतही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५) वरिल नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवे प्रमाणे असलेले नियम व अटी शर्ती या बाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

६) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसीक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

७) कोविड-१९ साथरोगाच्या अनुषंगाने पदभरती असल्याने संबंधीत आजाराचा प्रादुर्भाव जसा वाढत जाईल त्या अनुषंगाने नियुक्ती आदेश देण्यात येतील. यामुळे उपरोक्त पदाकरिता रिक्त पदसंख्या नमुद केलेली नाही तथापी सदरील पदभरतीताबतचे सर्वाधिकार खालील स्वाक्षरीकर्त्यांनी राखुन ठेवलेले आहेत.

८) कौन्सीलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदात्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी तथापि वैध प्रामणपत्र नसलेल्या उमेदवरांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

९) अर्जाचा नमुना हा जाहिरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला असुन, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्व जबाबदारी ही उमेदवारांची राहील. या बाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही. उपरोक्त कोवडि १९ पदभरतीबाबत पुढील सुचना जिल्हास्तरावरील **yavatmal.nic.in & zpyavatmla.gov.in** दिनांक ०८/०८/२०२० याच वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येईल याचीसुध्दा उमेदवराने नोंद घ्यावी.

१०) उपरोक्त निवड केलेल्या उमेदवारास रु १००/- च्या बॉन्डवर करारानामा सादर करणे बंधनकारक राहील तसेच शासनामार्फत यापुर्वी निर्गमित केलेले सुचना वा शासन निर्णय लागु राहतील यांची नोंद उमेदवाराने घ्यावी.

११) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन २४ तासाच्या आतमध्ये नियुक्ती ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात यईल.

१२) कंत्राटी भरती प्रक्रिया स्थगीती देणे/रदद करणे/ पदभरती प्रकिया बदल करण्याचे अधिकरी अध्यक्ष, मा.जिल्हाधिकारी,यवतमाळ यांच्या स्तरावरुन राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

- स्वा -
सदस्य सचिव
कोविड-१९ साथरोग समिती तथा
जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय यवतमाळ

- स्वा -
अध्यक्ष
केविड-१९ साथरोग समिती तथा
जिल्हाधिकारी, यवतमाळ